एकाध्यायी

विचारगीता

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

विचारगीता

(आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार)

डॉ. सुहास पेठे
एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

✲ विचारगीता ✲

पुस्तकरूपाने प्रकाशित आवृत्ती चौथी : नोव्हेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

विचारगीता - संक्षिप्त विवरण

कोणत्याही माणसाला त्याच्या आयुष्यात दररोज कुठले ना कुठले प्रश्न पडलेले असतात. कधीकधी माणसं बेसावध असतात, कधी त्यांना परिस्थितीनं खूप अनुकूलता असते. कधी त्यांच्या साऱ्याच गोष्टी दुसऱ्यांमुळं विनायास चालतात - अशा काही कारणांनी काहींना प्रश्न पडत नाहीत, हा अपवाद होय. त्यांना जाणवले नसले किंवा आत्ता या क्षणी नसले तरी, अनेकदा प्रश्न असतातच किंवा ते कुठल्याही क्षणी उद्‌भवू शकतात, हे लक्षात ठेवलेलं बरं. म्हणून प्रश्न सोडवण्याची जी शक्ती माणसाच्या ठिकाणी विशेषरूपानं आहे, तिचा परिचय, ओळख आणि वापर करीत असणं, आपल्याच फायद्याचं आहे.

या ठिकाणी हे जरूर लक्षात घ्यावं की, माणसाचं आयुष्य पाहिलं तर, ते एका माणसापुरतं -जन्म ते मृत्यू- एवढंच दिसतं, पण

एकूण मनुष्यजीवन कधी सुरू झालं आणि ते कधीपर्यंत चालणार - ही गोष्ट इतकी विशाल आहे की, ती अनेकदा भल्याभल्यांच्याही विचारकक्षेच्या पलीकडं आहे, हे दिसून येतं.

माणसाच्या आयुष्यात अगणित प्रश्न, परिस्थिती यांचा आढळ होत असला, तरीही एवढ्या मोठ्या विशाल मनुष्यजगताचे मूळ प्रश्न हजारो वर्षं बऱ्यापैकी सारखे आहेत. देश-काल-हवामान-संस्कृती-चालीरीती अशा अनेक गोष्टींमुळं प्रश्नांत आणि त्यांच्या संख्येत बदल होत असतात. तरीही मनुष्याच्या शरीराचा ढाचा आणि तो चालण्याची यंत्रणा जशी एका मर्यादेपर्यंत जगभर सारखी असते, तसे या प्रश्नांतले अनेक प्रश्न सारखे असतात. त्याचबरोबर वर सांगितलेल्या कारणांमुळं काही प्रश्न फक्त त्यात्या कालमान-परिस्थितीनुसार बदलतात आणि त्याची त्यात्या वेळी लागू होणारी उत्तरं शोधावी लागतात.

या सगळ्यासाठी माणसाला लाभलेल्या काही अलौकिक

शक्तींपैकी एक मोठी विलक्षण शक्ती म्हणजे 'विचार' ही होय. माणसाच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं शोधली गेली आहेत, त्यामुळं त्याचं जीवन सोपं झालं आहे, अडचणी दूर झाल्या आहेत - ती या विचारशक्तीच्या योग्य वापरामुळं.

या विचारशक्तीचा सर्वांनी खरोखरच योग्य, विवेकी वापर केला, तर ज्याचेत्याचे प्रश्न सोडवण्याचं, खूप प्रमाणात कमी करण्याचं आणि पर्यायानं त्यामुळं सामाजिकच काय, जागतिक प्रश्नही असेच कमी करण्याचं सामर्थ्य या विचारशक्तीत आहे. तिच्यात सुरुवातीलाच हे लक्षात घेतलेलं बरं की, इथं अभिप्रेत असलेली विचारशक्ती ही सर्व मनुष्यमात्राला मिळालेली समान देणगी आहे. तिच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ, गरीब-श्रीमंत, धर्म-पंथ-देश अशा कुठल्या कारणांनी भेदभाव अभिप्रेत नाही. मुळात परमेश्वराच्या इतर देणग्यांप्रमाणंच ही विचारशक्तीची देणगीही अशीच सर्वांना समान

मिळालेली आहे, त्यामुळं ती तितक्याच उत्तम रीतीनं वापरून आपलं आणि अर्थातच इतरांचंही कल्याण साधणं शक्य आहे. किंबहुना तसं साधणं, हे माणसासमोरचं एक सात्त्विक आव्हानही आहे.

गेल्या शतकात या विचारशक्तीची अधिकाधिक जाणीव माणसाला होत आहे, ही अत्यंत स्वागतार्ह गोष्ट आहे. अविचारी माणसांइतकीच विचारहीन माणसं, सर्व जडचेतन जगाच्या ठेवणीला आणि स्वास्थ्याला धोक्यात आणतात. म्हणून विचार करायला लागणं, त्याला उत्तम दिशा असणं, तर्काची निरपेक्षता-तटस्थता सांभाळणं, विचारांना उत्तम-सात्त्विकतेची मर्यादा घालणाऱ्या प्रतिभेचं-भावाचं स्थान ओळखणं, विचार सर्वसमावेशक व सर्वांच्या हिताचे असणं- यांमुळं या विचारशक्तीचा वापर सर्वांच्या कल्याणासाठी खर्चित होऊ शकेल. त्यासाठी इतरांच्या विचारस्वातंत्र्यालाही मोकळेपणा ठेवणं गरजेचं आहे, तसंच विचारांवर वैयक्तिक शक्तीची, अनुभवाची जी

मर्यादा पडते तिची जाणीव ठेवून या विचारगीतेच्या आरंभी म्हटलं आहे :- आहे शुद्ध विचाराचे, स्थान मोठे जगात या ।
ज्ञानाचे, बुद्धिचे काम, वाढले शतकात या ।।१।।
विचारे सार शोधावे, ज्याने त्याने स्वतंत्रसे ।
अल्पबुद्धी इथे आहे, थोडके दिधले असे ।।२।।

माणसाच्या जीवनाला इतकी विविध अंगं आहेत की, अगदी प्राथमिक अशा देहापासून, पोटासाठीचे कष्ट, त्यासाठी लागणारा पैसा, आयुष्याचा अविभाज्य भाग असलेले कुटुंबीय-स्वजन, त्यांची गाठ, त्यांच्या प्रवृत्ती, आपल्या प्रपंचाचं खरं स्वरूप, आपलं समाजजीवन, सृष्टीमधलं स्थान, त्याविषयीची कर्तव्यं, कर्मांतलं कौशल्य, माणसाला अंतरंगानं समृद्ध करणारे आणि बाह्य जीवनावर त्याचा सुपरिणाम करणारे संगीत - साहित्य - कला, असे अनेक विषय यापुढं या विचारगीतेत साररूपानं-निष्कर्षरूपानं आपल्या विचारार्थ ठेवले आहेत.

सामान्यतः जिथं विचारानं अडण्याची आणि त्यामुळं भ्रमित होण्याची शक्यता आहे, अशा कर्म-धर्म-देश-कायदा-न्याय-परंपरा-वैज्ञानिक प्रगती अशा अनेक मुद्यांचा विचार पुढं थोडक्यात केला आहे. तर कोणत्याही स्थितीतल्या माणसाला अखेर नुसताच मृत्यू येऊ नये, तर त्याच्या आयुष्याचं सार्थक करणारी मुक्ती मिळावी, त्यासाठी सर्व भेदांपलीकडं कसं जावं आणि अत्यंत निरुपाधिकपणे ते कसं गाठावं, त्यासाठी मूलभूत असलेला माणसाचा अंतरंगातला बदल कसा साधावा-इथंपर्यंत अनुभवावर आधारलेलं काही सार शेवटी दिलं आहे.

सर्वांत सुरुवातीचा आणि न सुटल्यास अकारण दिशाहीनता आणि दुःख निर्माण करणारा विषय देहाचा. त्याचं महत्त्व तर आजन्म आहे. पण याचा अर्थ तो आपल्या स्वाधीन आहे असाही नाही आणि तो चैनीत ठेवावा असाही नाही आणि त्याची आबाळ करावी, असाही

नाही. हे स्पष्ट करताना इथं म्हटलं आहे :-

देहाचे जाणुनी मोल, द्यावे स्थान तया खरे ।
निसर्गाच्या क्रमे त्याचे, योग्य ते करणे बरे ।।३।।
चैनीत ठेवणे नाही, त्याची आबाळही नसो ।
आजन्म कष्ट करण्याची, शक्ती त्यात सदा वसो ।।४।।

यानंतर, आजच्या आयुष्यात नकळत महत्त्वाचं स्थान मिळालेल्या पैशासंबंधी विचार केला आहे. आज खरंतर पैसा जास्तीत जास्त कसा मिळेल आणि त्यातही कमी कष्टात, जवळच्या मार्गानं तो कसा मिळेल-असा विचार करण्याची प्रवृत्ती प्रबळ आहे. पैशाला एक स्थान आहे, हे नक्कीच. फक्त पैसा हितकारक होण्यासाठी या स्थानाचा आणि त्याला जोडून असलेल्या अनेक गोष्टींचा विचार करण्याची सवय लुप्त होत चालली आहे. पैशाच्या मर्यादित स्थानाचा, विशेषतः त्याच्या मर्यादित उपयोगाचा आणि विचार न केल्यास,

त्याच्या अमर्याद उपद्रवाचा विचार, ही आजच्या काळातली एक महत्त्वाची गरज आहे. मनुष्यजीवनाचं सर्वांत जास्त नुकसान करू शकणाऱ्या पैशाविषयी लक्षात ठेवावं की, त्याशिवाय चालणार नसलं तरी, लोभाचा, बिनकष्टाचा, कष्टाच्या प्रमाणाच्या बाहेर मिळणारा आणि दान देऊन शुद्ध न केलेला-पैसा दुःखाला कारणीभूत होतो : -

कष्टाने मिळविणे पैसा, दाने शुद्ध सदा घडो ।
चालेना त्याविना तरिही, कोणी लोभात ना पडो ।।५।।
एक वेळ कमी चाले, अती क्षोभास कारण ।
विनाकष्ट, अती जेथे, दुःखी होईल जीवन ।।६।।

चार माणसांच्या संबंधांशिवाय माणसाला जगता येणार नाही, हे खरं आहे.आपल्या गरजा-स्वार्थ जसे या संबंधांना कारणीभूत आहेत, तसेच ते त्यांचेही आपल्याशी संबंध असायला कारणीभूत आहेत, हे लक्षात ठेवून, तेवढी त्यांच्या स्वार्थाला, गरजांना आपण वेळ देण्याची,

त्यासाठी आपल्याला त्यांच्याकडून काही त्रास सोसावा लागण्याची सवलत ठेवावी. वरवरच्या माणसं गोळा होण्याला अर्थ नसतो. सारं काही ठीक चाललं असेल, विशेषतः आपल्यापासून दुसऱ्याला काही त्रास नसेल, तर ते संबंध हवेसे वाटतात. हीच अवस्था इतरांचीही असते. पण यात संबंध हवासा नसून, त्यापासून मिळणारं सुख हा खरा हवासा विषय असतो. जर त्या संबंधात सुख नसेल, तर ते संबंध नकोसे होतात, हे सत्य लक्षात ठेवावं. सुखाला नाती असतात, दुःख एकाकी असतं. मुळात आपण कुटुंबात किंवा समाजात जे एकत्र येतो, ते आपल्या इच्छेनं घडतं आहे, असं आपल्याला वाटतं. पण जरा तटस्थपणे विचार केला, तर हे लक्षात येईल की, कुटुंबातली अगदी जवळची चारपाच माणसंसुद्धा ठरवून एकत्र आलेली नाहीत, त्यांच्यात्यांच्या पूर्वप्रारब्धाच्या संबंधामुळं ती एकत्र येतात. हे लक्षात ठेवून प्रारब्धाचे संबंध पूर्ण करून मुक्त होण्याची दृष्टी असावी :-

स्वजनांच्या दक्ष कर्तव्यी, गुंतणे तेथ ना जरी ।
गरजा, स्वार्थ जाणूनी, वर्तणे नित्य अंतरी ।।७।।
सुखाला सर्व नात्याचे, जोडिती नसले तरी ।
नसे नाते कधी दुःखा, पोरके जगते घरी ।।८।।
प्रारब्धाचा जमे मेळा, एक त्यातील आपण ।
हीच अंतिम ठरे भेट, जरी सावध जीवन ।।९।।

कुणाच्याच प्रपंचाला बघून, भुलून आपण सुखी-दुःखी होऊ नये. कारण मुळातच सर्व प्रपंच अपूर्ण असतात, याची जाणीव प्रपंच पूर्ण करण्याच्या नादात असलेल्या माणसाला सहसा होत नाही. उलट अशी जाणीव नसल्यामुळं, त्याच्या प्रपंचात नसलेली दुःखसुद्धा निर्माण होतात. प्रपंच हा एक टप्पा-एक आश्रम म्हणून खचितच मोलाचा आहे. पण तो पूर्ण करायला जाणं भ्रामक आहे. कितीही भौतिक, लौकिक अनुकूलता असल्या, तरी कुठल्या ना कुठल्या कारणानं

त्यात अपूर्णता राहते, हे प्रत्ययाला येणारं सत्य आहे. आरोग्य, मुलंबाळं, घरदार, नोकरीधंदा, मानमान्यता, पुरेसं आयुष्य इ. असंख्य घटक या प्रपंचात असल्यामुळं, कुणाकडं काही असतात, तर काही नसतात. ही स्थिती कायमच राहते. त्याला राजारंक अपवाद नाही. प्रपंचाच्या अपूर्णतेबद्दल तक्रार असायचं कारण नाही. कारण तो त्याचा स्वभाव किंवा गुणधर्म आहे. यात प्रपंचाचा किंवा तो करणाऱ्या कुणाचा दोष मानण्याचंही कारण नाही. आपल्याला इतरांचे प्रपंच पूर्ण आहेत, असं वाटतं. हा भ्रम दूर झाला तरी खूप काम होईल. कारण इतरांच्या प्रपंचात आपल्याला अपूर्णता दिसत नसली, तरी ती असते, फक्त ते सारं बहुधा ज्याचं त्याला माहीत असतं, हे लक्षात ठेवलं तर, आपापल्या प्रपंचातल्या तक्रारी कमी होतात :-

प्रपंच फाटका आहे, राजा रंक कुणी जरी ।
बाहेर दिसते त्याला, भुलणे कधि न अंतरी ।।१०।।

अपुरा आतुनी असतो, रंगढंग वरी जरी ।
दोष ना त्यात कोणाचा, पण जाणून हे करी ।।११।।

स्वावलंबनानं आपलं आणि इतरांचं कल्याण साधतं. स्वावलंबन हा एक दैवी गुण आहे. ते अनेक बाबतीत शक्य आहे. त्यासाठीची शिकवणसुद्धा जितकी लवकर मिळेल, तेवढं हिताचंच आहे. स्वावलंबनानं त्यात्या बाबतीत इतरांची मदत लागत नाही, ही चांगली बाजू असली, तरी त्यात नकळत इतरांची गरज नाही, अशी भावना निर्माण होते आणि तिच्याचबरोबर येणारा स्वावलंबनाचा अहंकार नुकसान करतो, ते मात्र टाळावं :-

स्वावलंबी हरेकाने, व्हावे शक्य तिथे, तसे ।
होते साह्य तया योगे, ज्यांना ते जमले नसे ।।१२।।
अहंकार नसो ज्याला, जमले स्वावलंबन ।
कृपा त्यात असे जाणा, नसे स्वाधीन तनमन ।।१३।।

समाजाचं ऋण फेडण्यासाठी आपल्या व्यक्तिगत किंवा कौटुंबिक कर्मांबरोबर समाजासाठीही आजन्म कर्मं करण्याची गरज माणसाला आहे. त्याची सांगड घालणारे लोकही जागृत आहेत, थोर आहेत. फक्त त्यात धोका असा की, या सामाजिक कर्मांत ऋण फेडताना इतर अनेक गोष्टी, सावध राहिलं तरी येतात. उदा.पदं, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, ईर्षा, स्वतःच्या कार्यांची इतर कार्यांशी तुलना, त्यातून नकळत आपलं कार्य श्रेष्ठ मानण्याची शक्यता, हळूहळू कर्तव्यांपेक्षा तिथली कर्मं, पदं, मान-अशा अनेक कारणांनी त्या कर्मांचीसुद्धा नकळत आवड लागणं इ. आपण नसलो तर ती कामं नीट होणार नाहीत, त्यात समाजाचं नुकसान होईल-असे अनेक भ्रामक विचार शिरतात. त्यांतून मूळ उद्देश बाजूला राहून, आपल्याच अंगी त्या सामाजिक कर्मांचं दास्यत्व येतं.अनेकांना तर हे लक्षात येत असूनही,या कारणांसाठी त्यात्या कर्मांना नाही म्हणणं अवघड जातं. त्यात त्यांचा व्यक्तिगत

उद्धार होण्याचं जे अंतिम ध्येय आहे, त्यासाठी द्यायला वेळ उरत नाही. यात अर्थातच त्यात्या व्यक्तींचं नुकसान होत असतं. म्हणून अशा कर्मांतली निवड, कर्म करताना राखण्याची अलिप्तता अशी कौशल्य साधली, तर कर्मांची सवय लागून होणारं नुकसान टळतं :-

संस्था, सृष्टि, समूहांचे, आजन्म ऋण मानवा ।
फेडणे ते पुढे आहे, एक कर्तव्य या जिवा ।।१४।।
कर्माचे दास ना व्हावे, कर्मे नित्य जरी करी ।
ध्येयास युक्त ती घ्यावी, बाकीची टाळणे बरी ।।१५।।
कौशल्य निवडीमध्ये, कर्मे करण्यातही असे ।
साधते ज्यास तो थोर, अंती मुक्त सदा असे ।।१६।।

माणसाच्या आयुष्याला व्यक्तिगत स्वार्थापलीकडं नेऊन सामाजिक किंबहुना वैश्विक उंची आणि व्यापकता आणून देणारी जी क्षेत्रं आहेत, त्यात विशेषतः साहित्य, संगीत, वाचन, श्रवण, चित्रकला,

शिल्पकला, विविध मौलिक विषयांचा व्यासंग-अशा अनेक गोष्टी येतात. या साऱ्यांचा अभ्यास घडत जातो, तसा मनुष्य अंतरंगानं विशाल होत जातो. त्याचं आयुष्य अनुभवानं-अभ्यासानं समृद्ध होत जात असतं. सगळ्यांना कुठल्या कला स्वतःला आत्मसात होतीलच असं नाही. पण बहुधा कुठली ना कुठली कला त्याच्यात उपजत असते, तिचा विकास करणं, हेही माणसाला माणूसपण देणारी आणि स्वास्थ्य निर्माण करणारी महत्त्वाची विद्या आहे. त्यातूनही एखाद्याला यातलं काहीच शक्य नसलं, तरी या कलांची उपासना करणाऱ्या व्यक्तींच्या कलांना आपल्या आयुष्यात स्थान देणं, त्यांचे आविष्कार पाहाणं, श्रवण करणं अशा गोष्टींनीही, या कलांना कुणाच्याही आयुष्याला विधायक स्थान मिळू शकतं. कलाकार खरा जीवनाचा उपासक असेल, तर तो या मार्गानं थोर होत असतोच, पण त्या कलेचं मर्म जाणून दाद देणारा,त्याचा आनंद घेणारा हाही अशा कलाविश्वांमुळं

समृद्ध होत असतो. हे स्पष्ट करताना म्हटलं आहे :-

शब्द, सूर तशा रेषा, कला माणूस घडविती ।
अंतरंगे मनुष्यांची, समृद्ध करिती किती ।।१७।।

या साऱ्या कलाविश्वाला मुळात प्रतिभेचा आणि त्याअर्थानं भगवंताचा आधार असला तरी, त्यावरही माणसानं अधिक विचार करीत असावं, हे बरं ! कारण जसं समाजकार्यात होईल, तसंच कलांमध्येसुद्धा कलेचा अहंकार, दाद किंवा कौतुकाची अपेक्षा, एकमेकांच्या कलेची हानिकारक तुलना, स्टेज-संधी यांच्या अपेक्षा, त्यात होणारे न्याय-अन्याय - अशा अनेक गोष्टींमुळं येणारी कटुता, दुःख, असूया- अशा अनेक नकारात्मक गोष्टींच्या बाबतीत वेळीच विचार करावा लागतो आणि सावधान राहावं लागतं.

या साऱ्याच्या मुळाशी जाऊन विचार केला, तर आयुष्य समृद्ध करू शकणाऱ्या या कलाविश्वापासून, त्याच्या आनंदापासून आपल्याला

वंचित करणारा महत्त्वाचा घटक अहंकार आहे, हे विचारानं लक्षात येतं. खरं पाहिलं तर, आपण वर ज्या कला पाहिल्या, त्यांतल्या अनेक कलांचे आविष्कार हे सृष्टीमध्ये अगणित स्वरूपात सर्वत्र आढळतील. त्यात झाडपेड, नद्या, डोंगर, माणसं- अशा रूपानं चित्रकला, पशूंच्या बीजमंत्रांच्या उच्चारांपासून ते दगडातल्या अनाहत नादापर्यंत संगीत, तर अशाच उच्चारांपासून, नादांपासून उमटणाऱ्या शब्दांपासून ते मंत्रद्रष्ट्या ऋषींना दर्शन देणाऱ्या देववाणीपर्यंतचं अमोल वाङ्मय-साहित्य, अशा असंख्य कला वावरताना दिसतील. त्याचबरोबर तिथं हेही दिसेल, शिकता येईल की, त्यात्या ठिकाणचे त्याचे कर्ते आणि त्यांचा सर्वांचा खरा कर्ता परमेश्वर - निसर्ग या साऱ्या अकृत्रिम असलेल्या कलाविश्वाबद्दल किती निरहंकार आहे ! त्यात कुठल्या झाडापेडाची, डोंगरदरीची, पाखरंपशूंची, नदीसागराची तुलना नाही, स्पर्धा नाही, असूया नाही, कुणी दाद द्यावी, कौतुक करावं, अशीही

अपेक्षा नाही. त्यामुळंच साऱ्या सृष्टीमध्ये खरा निखळ आनंद वावरत असतो. आपल्याला समृद्ध करीत असतो. आपलं कलाविश्व कोणतंही असो, ते खरं कसं असावं - ज्याच्यामुळं आपण खऱ्या अर्थानं समृद्ध, सुसंस्कृत होऊ शकू, ते या निसर्गाच्या कलाविश्वात जाऊन सावधानतेनं, सातत्यानं शिकत असावं, हा विचार हिताचा आहे :-

अकृत्रिम कलाविश्व, सृष्टीमध्ये वसे खरे ।
निरहंकार कसे कर्ते, तेथे ते शिकणे बरे ।।१८।।

समाजजीवन हा व्यक्तीच्या जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. त्यामुळं प्रत्येकाच्याच गरजा पुऱ्या होऊन प्रगती होत असते. त्यासाठी कुटुंब, समाज, देश अशा अनेक प्रकारच्या व्यवस्था निर्माण झाल्या आहेत. माणसं एकत्र आली की, स्वार्थ, दुराग्रह, लोभ अशा अनेक अनिष्ट प्रवृत्तीसुद्धा एकत्र येतात. म्हणून सामूहिक जीवनाला सुरळीत चालण्यासाठी विधिनिषेध, धर्म, कायदेकानू - अशा अनेक यंत्रणा

निर्माण होतात. त्यांचा वापर चांगला असला, तरी त्यामागचा हेतू कधी विसरून चालत नाही. व्यक्तीचं मूलभूत स्वातंत्र्य, स्वास्थ्य आणि त्या रूपानं उद्धार - हा मूळ हेतू साध्य होत नसेल किंवा या कायदेकानूत, तसंच अशाच विविध परंपरांत - जर काळानुरूप बदलक्षमता नसेल, तर त्या साऱ्या व्यवस्था मानवी आहेत हे जाणून त्यातले दोष दूर करणं, त्याज्य परंपरा धैर्यानं टाकणं, याची गरज आहे. त्याचबरोबर नव्या कालपरिस्थितीला योग्य असलेले बदल घडवले नाहीत, तर नियमांचे सांगाडे उरतात, त्यात चैतन्यमय व्यक्ती हरवते, तिच्या उद्धाराचा हेतू साधत नाहीसा होतो :-

घडण्या कार्य कुठलेही, होण्या सुकर जीवन ।
व्यवस्था लागते तेथे, थोडे नियमपालन ।।१९।।
वेष वा देश वा न्याय, कुटुंबे, कर्म, धर्म वा ।
व्यवस्था मानवी साऱ्या, स्मरणे नित्य मानवा ।।२०।।

म्हणुनी दोष व्यवस्थांत, कोणी, कोठे करो किती ।
निर्जीव कायदे-शब्द, चैतन्यास न बांधती ।।२१।।
निर्व्यवस्था नसे मार्ग, करावे दोषशोधन ।
व्यक्तिचे स्वास्थ्य, स्वातंत्र्य, गाठणे ध्येय पावन ।।२२।।
परंपरा परीक्षूनी, घ्यावी निवडूनि आदरे ।
त्याज्य ते टाकिता धैर्ये, मनी भीती नको बरे ।।२३।।
ध्येयाची वर्तनी गाठ, घालता हो परंपरा ।
काळ-प्रश्न नवे येता, शोधणे नव उत्तरा ।।२४।।

आजची वैज्ञानिक प्रगती अभूतपूर्व आणि दिपवून टाकणारी आहे. पण दुसऱ्या बाजूला ती प्रगती साधणारा माणूस मात्र, वृत्तीनं बदललेला नाही. तो होता तसाच स्वार्थी, दांभिक, विकारवश-असा राहिला आहे. उलट या सुखसाधनांनी त्याची लोलुपता आणखीनच वाढून त्याचं स्वास्थ्य धोक्यात आलं आहे. यावरची उत्तरं विज्ञानात

नाहीत. ती आता आत्मज्ञानाच्या प्रांतात जाऊन शोधावी लागतील :-

शस्त्रे, रसायने, शास्त्रे, औषधे, परमाणु वा ।
वाढती सुखविज्ञाने, झेप ही दिव्य मानवा ।।२५।।
परी होता तसा आहे, कर्ता मानव आदिम ।
स्वार्थ, दंभ, विकाराला, कोठे उत्तर उत्तम ।।२६।।

आणखी एका प्रवृत्तीला आजकाल जास्त प्रतिष्ठा प्रत्येक क्षेत्रात मिळाली आहे. ती म्हणजे स्पर्धा होय. तिनं शाळेपासून जागतिक राजकारणापर्यंत सर्वत्र स्थान मिळवलं आहे. तुलनेनं माणसाची प्रगती होते, त्यासाठी काही मानदंड ठरवावे लागतात, हे खरं असलं, तरी इतरांशी-कुणाच्या तरी यश किंवा स्थितीशी तुलना करीत राहाणं, म्हणजे आपलं जीवन अकारण आयुष्यभर दुःखी करून घेण्यासारखं आहे.कारण या तुलनेला अंत नसतो.अशा घातक तुलनेनं-स्पर्धेनं मुळात भ्रामक असलेली ध्येयं तर प्राप्त होत नाहीतच, पण स्वतःकडं असलेल्या

स्वास्थ्यकारक गोष्टींची जाणीवही राहात नाही. स्पर्धा प्रगतीसाठी करायची असली, तरी खरी प्रगती कुणापेक्षा काही होण्यात किंवा कुणापेक्षा काही जास्त वस्तू - गोष्टी मिळवण्यात नसून ती प्रगती स्वतःच्या चित्ताला किती समाधान आहे, ते किती वाढतं,टिकतं, यात आहे. त्या अर्थानं समाधान हा प्रगतीचा खरा मानदंड आहे. त्यासाठी स्पर्धा, तुलना करायचीच झाली, तर ती स्वतःच्या कालच्या स्थितीशी असू शकते. हे लक्षात ठेवलं, तर आजचं खूप अस्वास्थ्य दूर होईल :-

खरी स्पर्धा स्वत:शीच, बाकी दु:खास कारण ।
समाधान खरी प्रगती, बाकीचे ढीग दारुण ।।२७।।

आजच्या माणसाच्या आयुष्याची दिशा जास्तीत जास्त पैसा, इस्टेट यांच्याकडं प्रवास करणारी आहे. त्यांच्या संग्रहाची निश्चित मर्यादा ठरलेली नसल्यामुळं, किंवा विसरल्यामुळं हा प्रवास न संपणारा आणि त्यामुळं कायम अस्वास्थ्य देणारा ठरतो. यासाठी हे श्लोक,

त्यांतला शाश्वत विचार रोज समोर असणं आपल्याच हिताचं ठरेल :-

येथले येथ ठेवावे, लागते सर्वही धन ।
घरेदारे असो सत्ता, मृत्यूने पारखे जन ।।२८।।
मिळविता, टिकविता सर्व, याचे भान सदा असो ।
अंति जो येत सांगाती, त्याचे नाम मुखी वसो ।।२९।।

कुणीही, कितीही आणि काहीही गोळा केलं असलं, तरी मृत्यूच्या एका फटकाऱ्यात ते सारं त्याच्यापासून हिरावून घेण्याचं सामर्थ्य आहे. हे सत्य शाश्वत असलं, तरी पैसा, इस्टेट, सत्ता अशा गोष्टी आणखी आणखी मिळवण्याच्या नादात, त्या सत्याचा आणि त्यासाठी अनिवार्यपणे काही करण्याचा, वेळ देण्याचा विसर पडतो. वास्तविक, हे सारं मिळवायला कारणीभूत असलेला आपला मनुष्यदेह देणाऱ्या भगवंताचं भान, हा माझ्या दैनंदिन जीवनाचा अपरिहार्य भाग असायला हवा. पण त्याउलट देवाचं स्मरण करायला, नाम

घ्यायला मला वेळ उरत नाही, असं म्हणणारी कित्येक माणसं भेटतील. वास्तविक, यात मनुष्यदेहाची देणगी सर्वांना सारखीच मिळाली आहे. ती देणाऱ्या भगवंताचं नामच अखेर आपली निश्चित सोबत करीत असतं. ते शेवटी यावं, म्हणून त्यासाठी रोज वेळ देणं, हे सर्वांचंच प्रामाणिक कर्तव्य नाही का ? :-

मिळविता, टिकविता सर्व, याचे भान सदा असो ।
अंति जो येत सांगाती, त्याचे नाम मुखी वसो ।।२९।।
त्यासाठी वेळ काढावा, व्यवसाय कुठला असो ।
अज्ञ वा सुज्ञ वा कोणी, सानाथोर कसा असो ।।३०।।

माणसाला कर्मस्वातंत्र्य आहे. ते तो वापरतोही. पण अनेकदा हे लक्षात येत नाही की, त्याच्या या कर्मस्वातंत्र्याला जवळजवळ सगळ्या क्षेत्रांमध्ये एक मर्यादा आहे. त्यापलीकडं त्याला स्वातंत्र्य नाही, म्हणजे त्याला हव्या तशा गोष्टी तो घडवू शकत नाही. व्यक्तीला

एकाच बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य आहे. ते म्हणजे खरा ईश्वर जाणणं- म्हणजे आपला उद्धार करून घेणं. त्यासाठी ईश्वर शोधण्याची प्रवृत्ती निर्माण झाली तरी, ती सातत्यानं टिकवून ठेवणं, वाटचालीत येणाऱ्या अडचणींचा उलगडा होणं, त्या प्रवासाला लागणारी मदत मिळणं- यासाठी ओळखून असावं की, हे साधन करणाऱ्या इतर व्यक्ती, कुणी मार्गदर्शक गुरू यांची आपणच कटाक्षानं, नित्यानं भेट घेत राहावं लागतं. नातेवाईक हे व्यवहाराला सोबती असले, त्यासाठी त्यांच्या भेटीगाठी घेणं प्रसंगाप्रमाणं आवश्यक असलं, तरी आपलं मुक्तीचं मूळ ध्येय साधायला मदत करणारे खरे सोबती म्हणजे अशा साधनमार्गातल्या व्यक्तीच होत. हिताचा विचार करता, तेच आपले खरे आप्त होत, म्हणून सत्संग अपरिहार्य समजावा :-

कर्त्याला कर्मस्वातंत्र्य, लाभले देव जाणण्या ।
सत्संग नित्य साधावा, आत्मारामास भेटण्या ।।३१।।

सद्‌गुरू, साधनी व्यक्ती, सेवावे आप्त ते खरे ।
मुक्तिचे तेच सांगाती, नित्याने भेटणे बरे ।।३२।।

देवाविषयीच्या अनेक कल्पना आजवर माणूस करीत आला आहे. करीत राहीलही. पण देवाची कल्पना शुद्ध करून घेणं, हे विचाराचं सर्वांत मोठं, अंतिम कार्य आहे. आज जे जे जग देहाच्या साहाय्यानं मनुष्य अनुभवतो, त्यानुसार मतं, शास्त्रं, सिद्धान्त मांडतो, त्याचा प्रथम विचार करावा. तर लक्षात येतं की, तो देह प्रतिक्षणी नाश पावतो आहे, बदलतो आहे. त्या अर्थानं साऱ्या जगातही सतत बदल, नाश घडत आहेत. त्यामुळंच या सततच्या अशाश्वततेबरोबर त्याचं सुखदुःखही सतत बदलत राहातं आहे. हे अशाश्वत असल्यामुळं हे हिंदोळेही तसेच राहणार. फक्त एक पाऊल पुढे जाऊन विचार केला, तर लक्षात येतं की, या साऱ्या बदलांत,त्याच्या देहातसुद्धा एक गोष्ट शाश्वत आहे, राहाते. ती म्हणजे त्याच्यातलं चैतन्य. तसंच ते

या साऱ्या बदलत्या विश्वातही कायम विद्यमान आहे. ते शाश्वत असल्यामुळं त्याला सुखदुःखांचे चढउतार लागू होत नाहीत. हे शाश्वत चैतन्य म्हणूनच, शाश्वत समाधान देऊ शकतं. तोच शुद्ध देव होय. या शाश्वत चैतन्याची जाणीव देणारा, आजन्म चाललेला, अनुभवायला येणारा श्वास हा त्याचा अनुभव होय. शुद्ध, निर्मळ विचारानं हा देव किती जवळ आहे, हे लक्षात आलं तर, माणसाची जगात सर्वत्र चाललेली देवाची शोधाशोध आपोआप थांबेल आणि त्याची देवभेट - शाश्वत समाधान त्याला प्राप्त होईल. फक्त त्यासाठी, ही खूण शुद्ध विचारानं शोधून काढावी. तिच्यामुळं आपल्याला मिळणारा चैतन्याचा-शाश्वताचा प्रत्यय घ्यावा,मग देवासाठीची शोधाशोध थांबेल,शाश्वताच्या जागृत संपर्कामुळं खऱ्या समाधानाचा अनुभवही येईल :-

शाश्वतात समाधान, देव सर्वांस नित्य तो ।
अंतरी असता त्याला, जो तो सर्वत्र शोधितो ।।३३।।

अशाश्वत पहा सारे, बदले विश्वव्यक्तिही ।
दु:ख अस्वास्थ्य हिंदोळे, देते सर्वांस प्रत्यही ।।३४।।
जरी बदलतो देह, नित्य चैतन्य यातिल ।
आजन्म चालतो श्वास, ती त्याची खूण येथिल ।।३५।।
देवास शोधितो जगती, श्वासाची जाण ना असे ।
मिळते का कुठे काही, जेथे जे ठेविले नसे ।।३६।।
देहात चालतो श्वास, काही ना करि सर्वथा ।
आजन्म कर्मव्यापार, चाले का तरि अन्यथा ।।३७।।

इथंपर्यंतचा प्रवास बुद्धीच्या, शुद्ध विचाराच्या साहाय्यानं करता येतो. आणखी थोडं पुढं जायचं ठरवलं तर लक्षात येईल की, जर माझ्या देहाला शाश्वताचा स्पर्श देऊन जाणारा श्वास मला देवाची खूण देऊ शकतो, समाधानाचा अनुभव देऊ शकतो, तर या साऱ्या विश्वाला चैतन्य देणारा - त्या अर्थानं विश्वाचा शाश्वत चालक असलेला

श्वास - परमेश्वर शोधून काढणं शक्य आहे. पण त्याचबरोबर ते करून बघायचं ठरवलं, तर आपल्या मानवी बुद्धीची आणि विचारशक्तीची मर्यादा आता स्पष्ट होईल. शुद्ध विचार आपल्याला आपल्यापुरता शाश्वताचा अनुभव-समाधान देऊ शकतो. ते आपल्याला पुरेसंही आहे. पण जिज्ञासा म्हणून, या साऱ्या विश्वाला चैतन्य देणारा श्वास शोधायचा ठरवला, तर तो विश्वात्मक श्वास-देव आता मानवी शक्तीपलीकडं का आणि कसा आहे, याची जाणीव होईल. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं, याही बाबतीत प्रत्येकाला आपला मार्ग, आपलं उत्तर शोधण्याचं स्वातंत्र्य आहे. म्हणून म्हटलं आहे :-

तसा विश्वातला श्वास, पाही शोधून कोणता ।
विश्वव्यापार तसा कर्ता, थकते बुद्धि शोधता ।।३८।।
वाटते जगती ज्याला, समाधान खरे हवे ।
त्याने उत्तर कोठेही, शोधुनी पाहणे नवे ।।३९।।

ज्या विचाराच्या शक्तीच्या साहाय्यानं या साऱ्या विचारगीतेचा प्रवास आत्तापर्यंत केला, त्यात हे पुन्हा एकदा अधोरेखित करण्यासारखं आहे की, शुद्ध, सरळ विचार करायला मूळ बुद्धीही शुद्ध लागते. त्याअर्थानं अंतरंग पूर्वग्रह, मतं, अनुभव, विविध विकार यांच्यापासून मुक्त करावं लागतं. त्या अर्थानं असं शुद्ध अंतरंग, त्यामुळं असलेली शुद्ध बुद्धी, त्यामुळं होणारा शुद्ध विचार साहजिकच शक्य होतो आणि तो सर्वांच्या कल्याणाचा असतो. जगातल्या बाकीच्या कुठल्याही गोष्टी हिताच्या ठरायला, माणसाजवळ असलेली बुद्धी शुद्ध असावी लागते :-

शुद्ध बुद्धी असे तेथे, अणूहि हितकारक ।
अंतरे नसता थोर, ठरते सर्व मारक ।।४०।।

चैतन्याचा स्पर्श देणाऱ्या शाश्वत श्वासाच्या मार्गानं परमेश्वराकडं जाण्याचा, तो जाणणं, अनुभवणं याचा प्रवास हा एक

मार्ग आहे. मूलतः देव सर्वत्र असल्यामुळं आपल्याला कळणाऱ्या भाषेमध्ये सांगण्यासाठी हा मार्गाचा उल्लेख आहे.

अन्यथा आपण हे जाणू शकू की, सर्वत्रच असलेल्या गोष्टीला कुठला मार्ग नसतो आणि त्याची गरजही नसते. म्हणूनच या विचारमार्गाऐवजी एखाद्यानं शुद्ध, निरपेक्ष-सेवा, प्रेम, सत्य तसंच शुद्ध आचार किंवा मन, त्याचप्रमाणं कुठला सगुण-निर्गुण देव मानला, विवेक देव मानला- हे सारं प्रत्यक्ष जीवनात आणलं, तर तेही मार्ग त्याला परमेश्वराचा प्रत्यय देतील आणि त्याचं जीवन सार्थकाचं करू शकतील. इथं उल्लेख केलेले मार्गच नव्हे, तर इतरही असंख्य मार्ग यासाठी असू शकतील. फक्त, तो मार्ग चालून आपलं अंतरंग पालटून देवमय होतं का, त्या निरुपाधिक शाश्वत समाधानाचा नित्य प्रत्यय येतो का - ही कुठल्याही मार्गाची कसोटी त्या देवाचं - मार्गाचं खरेपण ठरवील :-

सेवा, प्रेम तसे सत्य, शुद्ध आचार अन् मन ।
हेही देव, भजे त्याचे, होते सार्थक जीवन ।।४१।।
विवेक देव वाटोत, कोणा सगुण निर्गुण ।
अंतरा पालटी देव, त्याच देवा खरेपण ।।४२।।

देहाचं स्थान आणि मोल ओळखण्यापासून सुरुवात केलेल्या शुद्ध विचारानं, या विचारगीतेमध्ये आपण अंतरंग पालटू शकणाऱ्या खऱ्या देवाच्या विचारापर्यंत प्रवास केला. तो सारा प्रवास समजून घेऊन त्यावर मनन, चिंतन करून त्यानुसार आचरणाचे प्रयोग करून त्याचा लाभ घेणारे लोक थोरच होत. म्हणून अशा सर्व विचारशील, मननशील आणि आचरणशील थोर मंडळींना कृतज्ञतेनं आणि आदरानं शेवटी नमन केलं आहे :-

एक अध्याय गीता ही, विचारे मननी ठसो ।
वाचितो आचरी जो जो, दीनाचे नमन त्या असो ।।४३।।

।। श्री संतचरणार्पणमस्तु ।।

एकाध्यायी विचारगीता

आहे शुद्ध विचाराचे, स्थान मोठे जगात या ।
ज्ञानाचे, बुद्धिचे काम, वाढले शतकात या ।।१।।

विचारे सार शोधावे, ज्याने त्याने स्वतंत्रसे ।
अल्पबुद्धी इथे आहे, थोड्के दिधले असे ।।२।।

देहाचे जाणुनी मोल, द्यावे स्थान तया खरे ।
निसर्गाच्या क्रमे त्याचे, योग्य ते करणे बरे ।।३।।

चैनीत ठेवणे नाही, त्याची आबाळही नसो ।
आजन्म कष्ट करण्याची, शक्ती त्यात सदा वसो ।।४।।

कष्टाने मिळविणे पैसा, दाने शुद्ध सदा घडो ।
चालेना त्याविना तरिही, कोणी लोभात ना पडो ।।५।।

एक वेळ कमी चाले, अती क्षोभास कारण ।
विनाकष्ट, अती जेथे, दु:खी होईल जीवन ।।६।।

स्वजनांच्या दक्ष कर्तव्यी, गुंतणे तेथ ना जरी ।
गरजा, स्वार्थ जाणूनी, वर्तणे नित्य अंतरी ।।७।।

सुखाला सर्व नात्याचे, जोडिती नसले तरी ।
नसे नाते कधी दु:खा, पोरके जगते घरी ।।८।।

प्रारब्धाचा जमे मेळा, एक त्यातील आपण ।
हीच अंतिम ठरे भेट, जरी सावध जीवन ।।९।।

प्रपंच फाटका आहे, राजा रंक कुणी जरी ।
बाहेर दिसते त्याला, भुलणे कधि न अंतरी ।।१०।।

अपुरा आतुनी असतो, रंगढंग वरी जरी ।
दोष ना त्यात कोणाचा, पण जाणून हे करी ।।११।।

स्वावलंबी हरेकाने, व्हावे शक्य तिथे, तसे ।
होते साह्य तया योगे, ज्यांना ते जमले नसे ।।१२।।

अहंकार नसो ज्याला, जमले स्वावलंबन ।
कृपा त्यात असे जाणा, नसे स्वाधीन तनमन ।।१३।।

संस्था, सृष्टि, समूहांचे, आजन्म ऋण मानवा ।
फेडणे ते पुढे आहे, एक कर्तव्य या जिवा ।।१४।।

कर्माचे दास ना व्हावे, कर्मे नित्य जरी करी ।
ध्येयास युक्त ती घ्यावी, बाकीची टाळणे बरी ।।१५।।

कौशल्य निवडीमध्ये, कर्मे करण्यातही असे ।
साधते ज्यास तो थोर, अंती मुक्त सदा असे ।।१६।।

शब्द, सूर तशा रेषा, कला माणूस घडविती ।
अंतरंगे मनुष्यांची, समृद्ध करिती किती ।।१७।।

अकृत्रिम कलाविश्व, सृष्टीमध्ये वसे खरे ।
निरहंकार कसे कर्ते, तेथे ते शिकणे बरे ।।१८।।

घडण्या कार्य कुठलेही, होण्या सुकर जीवन ।
व्यवस्था लागते तेथे, थोडे नियमपालन ।।१९।।

वेष वा देश वा न्याय, कुटुंबे, कर्म, धर्म वा ।
व्यवस्था मानवी साऱ्या, स्मरणे नित्य मानवा ।।२०।।

म्हणुनी दोष व्यवस्थांत, कोणी, कोठे करो किती ।
निर्जीव कायदे-शब्द, चैतन्यास न बांधती ।।२१।।

निर्व्यवस्था नसे मार्ग, करावे दोषशोधन ।
व्यक्तिचे स्वास्थ्य, स्वातंत्र्य, गाठणे ध्येय पावन ।।२२।।

परंपरा परीक्षूनी, घ्यावी निवडूनि आदरे ।
त्याज्य ते टाकिता धैर्ये, मनी भीती नको बरे ।।२३।।

ध्येयाची वर्तनी गाठ, घालता हो परंपरा ।
काळ-प्रश्न नवे येता, शोधणे नव उत्तरा ।।२४।।

शस्त्रे, रसायने, शास्त्रे, औषधे, परमाणु वा ।
वाढती सुखविज्ञाने, झेप ही दिव्य मानवा ।।२५।।

परी होता तसा आहे, कर्ता मानव आदिम ।
स्वार्थ, दंभ, विकाराला, कोठे उत्तर उत्तम ।।२६।।

खरी स्पर्धा स्वत:शीच, बाकी दु:खास कारण ।
समाधान खरी प्रगती, बाकीचे ढीग दारूण ।।२७।।

येथले येथ ठेवावे, लागते सर्वही धन ।
घरेदारे असो सत्ता, मृत्यूने पारखे जन ।।२८।।

मिळविता, टिकविता सर्व, याचे भान सदा असो ।
अंति जो येत सांगाती, त्याचे नाम मुखी वसो ।।२९।।

त्यासाठी वेळ काढावा, व्यवसाय कुठला असो ।
अज्ञ वा सुज्ञ वा कोणी, सानाथोर कसा असो ।।३०।।

कर्त्याला कर्मस्वातंत्र्य, लाभले देव जाणण्या ।
सत्संग नित्य साधावा, आत्मारामास भेटण्या ।।३१।।

सद्‌गुरू, साधनी व्यक्ती, सेवावे आप्त ते खरे ।
मुक्तिचे तेच सांगाती, नित्याने भेटणे बरे ।।३२।।

शाश्वतात समाधान, देव सर्वांस नित्य तो ।
अंतरी असता त्याला, जो तो सर्वत्र शोधितो ।।३३।।

अशाश्वत पहा सारे, बदले विश्वव्यक्तिही ।
दु:ख अस्वास्थ्य हिंदोळे, देते सर्वांस प्रत्यही ।।३४।।

जरी बदलतो देह, नित्य चैतन्य यातिल ।
आजन्म चालतो श्वास, ती त्याची खूण येथिल ।।३५।।

देवास शोधितो जगती, श्वासाची जाण ना असे ।
मिळते का कुठे काही, जेथे जे ठेविले नसे ।।३६।।

देहात चालतो श्वास, काही ना करि सर्वथा ।
आजन्म कर्मव्यापार, चाले का तरि अन्यथा ।।३७।।

तसा विश्वातला श्वास, पाही शोधून कोणता ।
विश्वव्यापार तसा कर्ता, थकते बुद्धि शोधता ।।३८।।

वाटते जगती ज्याला, समाधान खरे हवे ।
त्याने उत्तर कोठेही, शोधुनी पाहणे नवे ।।३९।।

शुद्ध बुद्धी असे तेथे, अणूहि हितकारक ।
अंतरे नसता थोर, ठरते सर्व मारक ।।४०।।

सेवा, प्रेम तसे सत्य, शुद्ध आचार अन् मन ।
हेही देव, भजे त्याचे, होते सार्थक जीवन ।।४१।।

विवेक देव वाटोत, कोणा सगुण निर्गुण ।
अंतरा पालटी देव, त्याच देवा खरेपण ।।४२।।

एक अध्याय गीता ही, विचारे मननी ठसो ।
वाचितो आचरी जो जो, दीनाचे नमन त्या असो ।।४३।।

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. अध्याय नववा : समओवी
२. हरिपाठपराग
३. दर्शन
४. कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट
५. साधनपदावली
६. जपसंकल्प
७. अभंगसाधना
८. जाग
९. जीवनजिज्ञासा
१०. विचारविश्वाची ओळख
११. चैतन्यचिंतन
१२. किमया
१३. प्रसादकण
१४. ठेवा
१५. संतबोध : भाग १
१६. संतबोध : भाग २
१७. संतबोध : भाग ३

१८. वृत्त्यंतरप्रकाश	१९. नाम
२०. श्री विष्णुसहस्रनाम	२१. चिंतनक्षण (एकत्रित आवृत्ती)
२२. उपासनेची नोंदवही	२३. उत्तरायण - भाग १
२४. शोध	२५. दिशा
२६. उत्तरायण - भाग २	२७. मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी
२८. बासरी	२९. उपासना
३०. अध्याय बारावा : समओवी	३१. कृपापदावली भाग : १
३२. कृपापदावली भाग : २	३३. साधनपदावली भाग १

३४. सारविस्तार भाग : १

३५. साधनप्रेरणा ३६. मेरी यात्रा (हिंदी)

३७. बोधपाठ ३८. एकाध्यायी विचारगीता

३९. सृष्टिसंदेश ४०. गुरुतत्त्वतरंगिणी

४१.समओवी पारायणप्रत ४२. नाम (इंग्रजी आवृत्ती)

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)

५५. शिदोरी ५६. विचारविसावा

५७. सारविस्तार भाग २ ५८. महाराजांची शाळा

५९. साधनपदावली भाग २ ६०. आरतीपुष्पमाला

६१. विनवणीची वाणी ६२. श्रद्धेची पहाट

६३. उपासनामाला

६४. पावनपथ

६५. अनुभवपुष्पे - भाग १

६६. कृतज्ञतामार्ग

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)

६९. संतबोध : भाग ४

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार

७१. उत्तरायण -भाग ३

७२. अनुभवपुष्पे - भाग २

७३. श्रद्धा

७४. अनुभवपुष्पे - भाग ३

७५. अर्घ्य

७६. जीवनचिंतन

७७. स्वास्थ्यसंवाद

७८. वचनांजली भाग १

७९. अक्षरायण

८०. वचनांजली भाग २

८१. भावगीता

***

विचारगीता

आजचे युग विज्ञानाचे, ज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांच्या कक्षा रुंदावण्याचे आहे. माणसातील विचारशक्तीही विकसित होत आहे. अशा वेळी विचारांची दिशा विधायक राहील तर या विचारविकासाचे फळ स्वास्थ्याच्या रूपाने माणसाला मिळू शकेल. असे विचारशोधनाने मिळणारे प्रपंचाचे, मानवी संबंधांचे, ध्येयांचे, स्वास्थ्याचे, देवाच्या खऱ्या स्वरूपाचे सार अत्यंत मोजक्या, गेय शब्दांत देणारी ही कालोचित एकाध्यायी विचारगीता. संतवाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक, साधक व विचारवंत डॉ. सुहास पेठे यांचे स्वानुभवाचे हे सूत्ररूप सार अनेकांना विचारप्रवर्तक व उपयुक्त ठरेल.

संतछाया, सातारा